# मुंबई विद्यापीठ

APD/ICC/2019-20/24

परिपत्रक

विषय : संलग्नित अनुदानित / विनाअनुदानित महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन (Accreditation) व पुर्नमुल्यांकन (Reaccreditation) करण्याबाबत

संदर्भ : १. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१०/२०/१०/विशि.३ दि. ८ ऑगस्ट, २०१०
२. क्र. एनजीसी/२०१६/नॅक/मवि–२–३/१४९७१ दि. ३१ डिसेंबर, २०१६
३. क्र. एनजीसी/२०१७/नॅक/मवि–२–३/८६४ दि. २० जानेवारी, २०१७
४. क्र. सहसं/उशि/कोविप/२०१७/३४० दि. ९ फेब्रुवारी, २०१७
५. मुंबई विद्यापीठ परिपत्रक क्र. वि.नि.वि.वि./२३५/२३ दि. १६ मार्च, २०१७

महोदय/महोदया,

प्राचार्य, सर्व संलग्नित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी व शिक्षणशास्त्र अनुदानित/विनाअनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालये/संस्था यांना कळविण्यात येते की केंद्र शासनाच्या मानव संसाधन व मनुष्यबळ विकास विभाग, नवी दिल्ली आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक दर्जा सुधारणे व गुणवत्ता अबाधित राखणे या धोरणावर शासनाने भर दिलेला आहे. त्या अनुषंगाने अशा सर्व अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयांनी नॅक मुल्यांकन/पुर्नमुल्यांकन करून घेणे बंधनकारक आहे. याबाबत दिनांक ८ ऑक्टोंबर, २०१० रोजी महाराष्ट्र शासनाने घेतलेला निर्णय माहितीकरीता सोबत जोडत आहे. सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्नीत सर्व पात्र महाविद्यालयांना नॅक मुल्यांकन व पुर्नमुल्यांकन करणे अनिवार्य असून शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) यांनी पाठविलेल्या क्र. एनजीसी/२०१७/नॅक/मवि –२–३ /८६४ दि. २०/१/२०१७ पत्रानुसार सर्व अनुदानित / विनाअनुदानित कायम विनाअनुदानित महाविद्यालयांनी नॅक मुल्यांकन/पुनर्मुल्यांकन करुन घेणे आवश्यक आहे.

विद्यापीठाशी संलग्नीत बऱ्याच महाविद्यलयांनी अजूनही नॅक मुल्यांकनासंबंधीची प्रक्रिया सुरु केलेली नाही अथवा प्रथम, व्दितीय मुल्यांकन/पुर्नमुल्यांकन झाल्यानंतर पुढील पुर्नमुल्यांकनाची प्रक्रिया सुरु केलेली नाही असे निदर्शनास आले आहे. याची शासनाने व विद्यापीठाने गंभीर नोंद घेतली आहे. अशा महाविद्यालयांवर दि. ८ ऑक्टोबर, २०१० च्या शासनाच्या परिपत्रकानुसार विद्यापीठाच्या वतीने कार्यवाही होऊ शकते. तद्‌वतच या बाबीचा थेट परिणाम महाविद्यालयाचे संलग्निकरण, नविन विषय/अतिरिक्त तुकडी मान्यता इ. वर देखिल होऊ शकतो यांची गांभीर्याने दखल घ्यावी.

(डॉ. अजय प्र. देशमुख)
कुलसचिव

मुंबई : ४०० ०३२
दिनांक : २ डिसेंबर, २०१९

प्रति:

१. संस्थाचालक / प्राचार्य संलग्नित शासकिय/ अशासकिय अनुदानित/विनाअनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालये
२. मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. स्वीय सहायक : १. कुलगुरू २. प्र–कुलगुरू ३. कुलसचिव ४. अधिष्ठाता

Scanned by CamScanner